दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १११ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अजित पवारांनी अर्थसंकल्प सादर करताना किती योजनांना कात्री लावली हे सांगावे-राजू शेट्टी

## लाडकी बहिणच्या नावाने मतदारांना लाच

मुंबई (वृत्तसंस्था)–उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यंदाचा अर्थसंकल्प सादर करताना त्या आर्थिक सर्वेक्षणात त्यांनी किती योजनांना कात्री लावली? हे सुद्धा सांगावे म्हणजे किती सामाजिक आणि दलित योजनांना कात्री बसली आहे, हे सुद्धा कळेल असे शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी म्हटले आहे. राजू शेट्टी पुढे बोलताना म्हणाले की, लाडकी बहिण योजना ही सरकारच्या पैशातूनच मतदारांना दिलेली लाच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. लाडकी बहीण योजनेत सरकारने कर दात्यांचा पैसा वापरून सरकारच्या तिजोरीतून ४६ हजार कोटींचा खर्च करण्याचा घाट घातल्याचा आरोप त्यांनी केला आहे.राजू शेट्टी यांनी म्हटले आहे की, विक्रमी बहुमत मिळूनसुद्धा या सरकारला अजून जिल्ह्याचे पालकमंत्री ठरवता येत नाहीत. म्हणजे हे बहुमत हे बेगडी आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे या पलिकडे सरकारने काही केलेले नाही आहे. जनतेने जो कौल दिला आहे त्यांचा भ्रमनिरास झालेला आहे. म्हणून जनतेनंसुद्धा सावध राहिले पाहिजे. खऱ्या अर्थाने लोकांच्या हिताची काळजी घेणारे लोक निवडून आले पाहिजे.



### तरुणांनी पेटून उठले पाहिजे

राजू शेट्टी म्हणाले की, खरंतर स्वर्गीय शरद जोशी म्हणायचे की, नेता तस्कर आणि गुंडा अफसर आणि हेच खरे तर सामान्य माणसाचे शत्रू आहेत. राजकारणी गुंडाना संरक्षण देत आहेत आणि त्यांच्या भानगडीवर पांघरून घालून अमाप पैसा कमवून संपत्ती आणि सत्ता गोळा करण्याचं काम सुरू आहे. मात्र यात सामान्य माणूस आता खचला जात आहे. बीडमध्ये सुद्धा हेच होत आहे. आता या सिस्टीमच्या विरोधात आताच्या तरुणांनी पेटून उठले पाहिजे.



### योजनेतून बाहेर निघणाऱ्या बहिणीची संख्या ९ लाखांवर

लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्य सरकारच्या वतीने राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून महिलांना घरबसल्या दीड हजार रुपये महिना देण्यात आला. त्यामुळे राज्य सरकारची लोकप्रियता वाढली आणि पुन्हा एकदा राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. आता या योजनेच्या निकषांमध्ये न बसणाऱ्या महिलांची नावे कमी केली जात आहेत. या कमी होणाऱ्या महिलांची संख्या आता नऊ लाख होणार आहे. यापूर्वी पाच लाख महिलांची नावे कमी करण्यात आली होती. यात आता नव्याने चार लाख महिलांची भर पडणार आहे.

### लाडक्या बहिणी या लाडक्या राहिल्या नाही का?

लाडकी बहिण योजनेतून महिलांची नावे कमी करण्याच्या निर्णयावर विरोधी पक्षाकडून टीका होत आहे. विजय वडेट्टीवार आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जयंत पाटील यांनी देखील या निर्णयावरून राज्य सरकारवर टीका केली आहे. मतदान प्रक्रिया संपल्यानंतर सरकारच्या वतीने आता लाडक्या बहिणी या लाडक्या राहिल्या नाही का? असा प्रश्न विरोधी पक्षाच्या वतीने केला जात आहे. त्यामुळे आता या सर्व घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सरकारच्या तिजोरीवरील बोजा देखील कमी होणार

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेच्या माध्यमातून सुमारे साडेसोळा लाख महिलांच्या खात्यावर थेट पैसे पाठवण्यात येत आहेत. मात्र आता यातील महिलांची नावे कमी होताना दिसत आहे. काही महिलांचे बँक खाते आणि नावात तफावत आढळून आली आहे. तर काही महिला निकषात बसत नसताना देखील त्यांनी अर्ज दाखल केले होते. अशा महिलांचे आधार कार्ड आता योजनेशी लिंक नसेल तर त्यांना या योजनेतून बाद केले जात आहे. त्यातच आता चार लाख महिलांची आणखी भर पडत आहे. त्यामुळे सरकारच्या तिजोरीवरील बोजा देखील कमी होणार आहे.

# शिवसेना महाविकास आघाडीला नवा धक्का देणार:पुण्यातील मोठे नेते शिवसेनेत येणार

## दोन दिवसात मोठा धमाका; उदय सामंत यांचा दावा

मुंबई (वृत्तसंस्था)–पुण्यातील महाविकास आघाडीचे काही बडे नेते दोन दिवसांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत येणार असल्याचा दावा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला आहे. सामंत यांच्या या दाव्यामुळे शिवसेनेच्या ठाकरे गटासह काँग्रेस व शरद पवार गटात एकच खळबळ माजली आहे.



उदय सामंत गुरुवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, पुण्यातील काही नेते दोन दिवसांत आमच्या पक्षात येणार आहेत. यात कुणाचा समावेश आहे, हे मी तुम्हाला योग्य वेळी सांगेन. आम्ही या मोहिमेला ऑपरेशन टायगर वगैरे नाव ठेवले नाही. हे नाव तुम्ही पत्रकारांनी ठेवले आहे. एकनाथ शिंदे हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विचार पुढे घेऊन जात आहेत. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून ठाकरे गटातील अनेक नेते व पदाधिकारी शिंदे गटात येत आहेत. हे सर्वकाही कोणत्याही ऑपरेशनशिवाय होत आहे.ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येत असताना शरद पवार व अजित पवारांनी एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाला विरोध केल्याचा दावा केला आहे. उदय सामंत यांनी राऊतांच्या या दाव्याचा समाचार घेताना उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. माझ्या माहितीनुसार शरद पवार दुसऱ्यांच्या पक्षात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करत नाहीत. पण काही लोकांनी (उद्धव ठाकरे) स्वतःला मुख्यमंत्रीपद मिळावे म्हणून एकनाथ शिंदे यांना त्यांना शरद पवारांचा विरोध असल्याचे सांगितले. पण त्यानंतरही शिंदे यांनी ते मोठ्या मनाने स्वीकारले, असे ते म्हणाले.उदय सामंत यांनी यावेळी महाराष्ट्रातील महापुरुषांविषयी आक्षेपार्ह विधान करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही केली. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्यासह महाराष्ट्रातील सर्वच महापुरुष व संतांवर आक्षेपार्ह ट्विट करून कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, असे ते म्हणाले. अभिनेता कमाल खान यांनी काही दिवसांपूर्वी संभाजी महाराजांविषयी वादग्रस्त ट्विट केले होते. त्यावरून महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. उदय सामंत त्याविषयी बोलत होते.काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शिवजयंतीदिनी शिवाजी महाराजांना श्रद्धांजली वाहिली होती. उदय सामंत यांनी यावरूनही काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले, राहुल गांधी यांना महाराष्ट्राची संस्कृती माहिती नाही. महाराष्ट्रातील महापुरुषांचे कार्य माहिती नाही, अशांना आम्ही इतिहास शिकवावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मी आज रेल्वे प्रवास करताना काही साहित्यिकांसोबत होतो. त्यांनी राहुल गांधी यांनी शिवरायांविषयी केलेल्या ट्विटवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

# मुख्यमंत्र्यांनी कृषिमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा:विजय वडेट्टीवार यांची मागणी

## आरोपी मंत्र्यांना क्लिनचीट देऊन पाठराखण करत असल्याचा आरोप

मुंबई (वृत्तसंस्था)– शेतकऱ्यांना भिकारी म्हणणारे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाने २ वर्षाची शिक्षा सुनावली आहे. आता तरी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. महायुती सरकारमधील उद्योगी आणि तेजस्वी लोकांमुळे दररोज सरकारची लाज निघत असल्याची टीका त्यांनी केली. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आरोपी मंत्र्यांना स्वतः क्लिनचीट देऊन त्यांची पाठराखण करत असल्याचा आरोपही विजय वडेट्टीवार यांनी केला.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना १९९५ च्या प्रकरणात २ वर्ष कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. माणिकराव कोकाटे यांच्यावर कागदपत्रांची फेरफार करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या खटल्यावर आज नाशिक जिल्हा न्यायालयात सुनावणी पार पडली. यानंतर न्यायालयाने त्यांना शिक्षा सुनावली आहे. यावरून आता विरोधकांकडू महायुती सरकारवर निशाणा साधला असून माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्याची



मागणी होत आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत सरकारवर हल्ला चढवला आहे. १९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर करण्यात आला आहे. यात मंत्री माणिकराव कोकाटे आणि भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे, ५० हजार रूपयांचा दंडही कोर्टाकडून ठोठावण्यात आला आहे. इतके उद्योगी आणि तेजस्वी लोक महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात आहेत की दररोज सरकारची लाज निघत आहे, असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला. दररोज आरोप होत आहे, कोर्टाकडून शिक्षेचे आदेश निघत आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आरोपी मंत्र्यांना स्वतः क्लिनचीट देऊन त्यांची पाठराखण करत आहे, असा आरोपही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीही माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सध्या मंत्रिमंडळ आणि लोकप्रतिनिधींमधून कमीत कमी १/३ लोकांवर विविध खटले चालू आहेत. हे लज्जास्पद आहे, अशी टीका अंधारे यांनी केली. प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना निगरगट्टपणे सरकारमध्ये थांबणे इथपर्यंत ठीक; मात्र जिल्हा न्यायालयाने २ वर्षाची शिक्षा सुनावल्यानंतर अशा मंत्र्याचा तातडीने राजीनामा घेतला गेला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# मला याआधीही अनेकवेळा धमक्या आल्या:पण मी त्याचा विचार करत नाही, माझे काम करत राहतो-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई (वृत्तसंस्था)–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याचा उल्लेख धमकीत करण्यात आला. याबाबत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, लॉ अँड ऑर्डरचे सहआयुक्त आणि पोलिस आयुक्तांनी या धमकीबाबत माहिती दिली. मला अनेकवेळा अशा धमक्या आलेल्या आहेत. पण मी असल्या धमक्यांचा कधी विचार केला नाही. मी माझे काम करत राहिलो आणि आताही काम सुरू राहणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिल्ली येथे मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या शपथविधी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. आजचा दिवस एनडीए आणि दिल्लीसाठी ऐतिहासिक आहे. २७ वर्षांनंतर दिल्लीच्या तख्तावर एनडीए आणि मोदींचा भगवा झेंडा फडकला आहे. रेखा गुप्ता ही लाडकी बहीण मुख्यमंत्री झाल्या. त्यामुळे आता दिल्लीत होणारे प्रदूषण, वाहतूक कोंडी तसेच थांबलेल्या विकास असे प्रश्न मार्गी लावण्यासाठी चालना मिळेल. विकासाला चालना मिळेल. महाराष्ट्रात जस डबल इंजिन सरकार काम करत आहे, तसेच दिल्लीच्या विकासासाठीही मोदींच्या मार्गदर्शनाखाली रेखा गुप्ता चालना देतील, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिलेल्या सिडकोच्या जालन्यातील खरपुडी प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री सचिवालयाकडून देण्यात आले आहेत. यावरही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. आम्ही सुरू केलेले प्रकल्प लोकहिताचे आहेत. या संदर्भात मी माहिती घेतो, असे ते म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी महायुतीतील कोल्ड वॉरही भाष्य केले. ते म्हणाले, सीएम वॉर रुममध्ये आपण मोठे प्रकल्प मॉनिटर करतो. एखाद्या प्रकल्पाला कुठे अडचण आहे का? याबाबत त्या वॉरमध्ये माहिती घेतली जाते. परंतु आम्ही जो सुरू केलाय, तो समन्वय कक्ष आहे. शिवसेनेकडे असणाऱ्या खात्यांचा आढावा घेण्याची त्या समन्वय कक्षाची जबाबदारी आहे. त्यामुळे कामाचे किंवा यंत्रणेचे कुठलेही डूप्लिकेशन नाही. समांतर यंत्रणा देखील नाही, असे स्पष्टीकरण दिले. महायुती सरकारमध्ये कुठलेही कोल्ड वॉर किंवा हॉट वॉर नाही. महाराष्ट्राला विकासाकडे नेण्याचा आमचा अजेंडा आहे. आम्ही एक टीम म्हणून काम करतोय आणि पुढे जातोय, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.मी गडचिरोलीचा पालकमंत्री असताना अनेक जहाल नक्षलवाद्यांचा पोलिसांनी बिमोड केला. अनेक मोठे नक्षलवादी मारले गेले. माझ्या पालकमंत्री पदाच्या कारकीर्दीत गडचिरोलीत सर्वात आधी सुरजागडचा प्रकल्प सुरू करण्यात आला. आता तिथे मोठ्या प्रमाणात स्टील इंडस्ट्री येत आहे. मुख्यमंत्री फडणवीस देखील स्वतः लक्ष घालत आहेत. अनेक एमओयू झालेले आहेत. त्यामुळे गडचिरोली आता नक्षलमुक्त जिल्हा होईल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. तसेच विकासाच्या मुख्य प्रवाहात गडचिरोली जिल्हा येईल, असेही ते म्हणाले.



# शिवजयंतीनिमित्त शिवरायांना अभिवादन

**पुलगाव । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज शोभायात्रा समितीच्या वतीने स्टेशन चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन, माल्यार्पण, अभिवादन, पोवाडा गायन, फटाक्यांची आतषबाजी व मिठाई वितरण करून शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.
जय भवानी जय शिवाजी चा जयघोष करत पुलगाव स्टेशन जवळ टिळक चौक परिसरात विभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण यांनी मातोश्री जिजामाता व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य मूर्तीचे पूजन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजहिताचे कार्य निर्भीडपणे करावे. भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे राज्य अध्यक्ष संजय गाते यांनी विचार व्यक्त करताना म्हटले की, न्यायप्रिय, आदर्श राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजसेवेचा ध्यास घेतला. मानवी अधिकार नाकारलेल्या जनतेला सन्मान मिळवून देण्यासाठी त्यांचा संघर्ष होता. कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे, प्रसिद्ध स्वर्णकार व सामाजिक कार्यकर्ते संदीप ढोमणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विजय निवल, डॉ. हकीम बोहरा, पत्रकार बहादूर चौधरी, सावरिया मारोठीया, रवि केशरवानी, अरविंद भार्गव, मातृसेवा परिवाराचे संस्थापक अविनाश भोपे, नगरसेवक गौरव दांडेकर, माजी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रशांत शहागडकर, राहुल वाढोणकर, माजी प्राचार्य दुबे, धर्मेंद्र अंबादे, गौतम नंदेश्वर, रुपेश जोशी, तुषार वाघ, विश्व हिंदू परिषदेचे अविनाश खोडे, नीरज ब्राम्हणे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन दिनेश येडांगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शुभम चव्हाण यांनी व्यक्त केले. उपस्थितांना मिठाईचे वाटप करण्यात आले. दिवसभर विविध संस्था व संघटनांनी शिवरायांना अभिवादन केले.




# चिखलगाव ते गिरगाव रस्त्याची दुरुस्ती तातडीने सुरू करा

## आमदार किर्तीकुमार भागडीया यांना निवेदन

**नागभीड । प्रतिनिधी**

चिखलगाव ते गिरगाव या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली असून, पावसामुळे हा मार्ग पूर्णतः खराब झाला आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थी जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत.
रस्त्यावरील डांबर पूर्णतः उखडले असून, गिट्टी पसरल्याने अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष



केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते महेश तात्याजी गिरडकर यांनी आमदार किर्तीकुमार भागडीया यांना निवेदन सादर केले. यावेळी आकाश बिबिसन बनसोड (अध्यक्ष, बांधकाम कामगार संघटना) उपस्थित होते. तसेच, चिखलगाव - गिरगाव - नवरगाव या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. नागरिक व विद्यार्थी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

# कवठा रेल्वे येथे शिव जयंती उत्साहात साजरी


**पुलगाव । प्रतिनिधी**

कवठा रेल्वे येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील नागरिक, युवक-युवती आणि महिलांनी या सोहळ्यात सहभाग घेतला.
वार्ड क्रमांक तीन येथे रोशन गणेश बुटके यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती आर्ट ग्रुप, रोशन आर्ट गॅलरी आणि सहकारी मंडळींनी प्रतापगड किल्ल्याचा देखावा साकारला. १५x१५ फूट जागेत साकारलेल्या या देखाव्यात अफजलखान वध प्रसंगाचे चित्रण करण्यात आले आहे. शिवजयंतीनिमित्त रांगोळी व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळी छत्रपती शिवाजी



महाराज, जिजाऊ व मावळ्यांच्या वेशभूषेत चिमुकल्यांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक द ग्रेट शिवबा प्रतिष्ठानपासून विठ्ठल-रखुमाई मंदिरापर्यंत जाऊन शिवपूजन करण्यात आले. यानंतर शिवपाळणा, शिववंदना आणि प्रेरणामंत्र कार्यक्रम झाले. बालकांनी शिवरायांबद्दल मनोगत व्यक्त केले. त्यानंतर बक्षीस वितरण करण्यात आले. किल्ला साकारण्याचे रोशन बुटके यांचे हे नववे वर्ष आहे. या उपक्रमासाठी रोशन आर्ट गॅलरी, छत्रपती आर्ट ड्रॉइंग क्लास आणि सहकारी मंडळींनी सहकार्य केले. किल्ल्याचा देखावा पुढील चार दिवस पाहता येणार आहे.

# शंकरराव भोयर पाटील महाविद्यालयात शिवजयंती साजरी





**पुलगाव । प्रतिनिधी**

शंकरराव भोयर पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. प्राचार्य डॉ. विलास हाडगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. अभिव्यक्ती कला मंच आणि हिंदी विभागाच्या वतीने निबंध व काव्यलेखन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. 'छत्रपती शिवाजी महाराजांचे सामाजिक व राजकीय विचार' या विषयावर विद्यार्थ्यांनी निबंध सादर केले, तर शिवरायांच्या जीवनावर आधारित कविता सादर करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आपले लेखन डॉ. दीप्ती कडू व डॉ. गजानन कदम यांच्याकडे सादर केले.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. नंदकिशोर वरघट, प्रा. डॉ. दीप्ती कडू, प्रा. विवेक जेधे, प्रा. डॉ. रमेश आगलावे, प्रा. डॉ. सचिन भोयर, प्रा. सुनील वाठोरे, तसेच कर्मचारी सनथ भैसारे, माटे मॅडम आणि वैभव भोयर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास आयटीआयचे प्राचार्य पाटील , वाघमारे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखेर एनएसएस समन्वयक प्रा. शकील खान यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

# आर.के.ज्ञान मंदिरमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी




**पुलगाव । प्रतिनिधी**

आर.के. ज्ञान मंदिर इंग्रजी माध्यम शाळेत छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास आणि पर्यवेक्षिका प्रणिता कोंबे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.
कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनावर मनोगते व्यक्त केली. समृद्धी वैद्य हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावर भाष्य केले, तर कल्याणी पोहेकर, अपेक्षा कुत्तरमारे, जान्हवी नंदेश्वर आणि राशी मुडे यांनी हलवा पाळणा बाळ शिवाजीचा हे गीत सादर केले. सम्यक जगनम याने माझ्या राजार... माझ्या शिवबार हे गाणे गात उत्साह वाढवला. शाश्वत येखंडे यांनी शिवाजी महाराजांची आणि तमन्ना गहलोत हिने जिजाबाईंची वेशभूषा साकारली. मैथी ठाकरे यांनी शिवगर्जना दिली. विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य नितीन श्रीवास यांनी शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेतील कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजशास्त्र शिक्षिका मालती ढगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समितीसह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# किसन बोरकर यांचे निधन

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.) (मूळ गाव - सावरगाव) येथील रहिवासी, काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते आणि प्रतिष्ठित नागरिक किसन घिनुजी बोरकर (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने बुधवार, १९ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजता अचानक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी ११ वाजता तळोधी (बा.) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे आणि मोठा आप्तपरिवार आहे.



# मधुकर गायकवाड यांचे निधन

**निलज । प्रतिनिधी**

निलज गावचे प्रगतशील बागायतदार मधुकर दशरथ गायकवाड (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते श्री आदिनाथ महाराज देवस्थानाचे निस्सीम भक्त होते. आपल्या शेतीविषयक आधुनिक दृष्टिकोनाने त्यांनी बागायती शेतीत मोठे योगदान दिले होते.माजी न्यायाधीश भागवतराव दशरथ गायकवाड यांचे ते बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



# 'ऋतुरंग' राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत आर.के.ज्ञान मंदिरमच्या विद्यार्थ्यांचे यश






**पुलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक महामंडळातर्फे आयोजित 'ऋतुरंग २०२४' राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत आर.के. ज्ञान मंदिरम इंग्रजी माध्यम शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. जवळपास ४०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेत ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे जिंकत शाळेच्या कीर्तीमध्ये भर टाकली.
प्रतिभेला वाव देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत सुमित वैद्य (इ. ९ वी), निशान ढोकणे (इ. ७ वी), दिव्यता पिंपळकर (इ. ७ वी), आराध्या मस्तूद (इ. ६ वी), सान्वी टेंभुर्णे (इ. ३ री) आणि निकेतन वरडकर (इ. २ री) यांनी विशेष यश संपादन केले.
विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केल्याबद्दल आर.के. ज्ञान मंदिरमला उपक्रमशील शाळा पुरस्कार आणि गौरवपत्र देण्यात आले. तसेच, कला शिक्षक प्रवीण दंडारे आणि कला शिक्षिका सीमा दंडारे यांना कला तपस्वी शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास, पर्यवेक्षिका प्रीती बिडकर व प्रणिता कोंबे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले. आर.के. स्कूल कमिटीचे विश्वस्त व अध्यक्ष रंजनकुमारजी केजरीवाल यांनी सर्व विजेत्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सेंट जॉन हायस्कूल,पुलगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी संचालित सेंट जॉन हायस्कूल, पुलगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्या आरती कुरझडकर आणि उपप्राचार्य महेंद्रजी भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती.
कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजन व माल्यार्पणाने झाली. या निमित्ताने प्री-प्रायमरी विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा आणि भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. फॅन्सी ड्रेस स्पर्धेत कु. मंजीरी वडाळकर हिला प्रथम, कु. वैष्णवी फटिंग हिला द्वितीय, कु. दिशा बावणे हिला तृतीय तर अद्वैत मेहकरे याला प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आला.विशेष आकर्षण म्हणून शिक्षिका रंजना भोयर यांनी मी शिवाजी हा एकपात्री प्रयोग सादर केला. तसेच सौ. श्रीवास मॅडम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार



तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत असे सांगून उपस्थितांना प्रेरणा दिली.कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका हेमा सलामे व गौरी वानखेडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षक सतीश नाईक आणि विद्यार्थी हुसेन धामिया यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# वाढोणा येथे ३५ शिवसैनिकांचे रक्तदान

## शिवजन्मोत्सव निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथे हिंदवी स्वराज्य ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिरासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात मंगळवारी (दि. १८) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याआधी दि. १७ रोजी ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले, तर १८ फेब्रुवारीला रक्तदान शिबिरासोबत सामान्य ज्ञान स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. रक्तदान शिबिरात ३५ शिवसैनिकांनी रक्तदान केले. डॉ. हेडगेवार रक्त केंद्र, नागपूरच्या चमूने रक्त संकलन केले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि एक बॅग भेट देण्यात आली.
माजी पंचायत समिती सभापती संजय घोनमोडे



(वाढोणा) यांनी सामाजिक बांधिलकी जपत ५० वेळा रक्तदान केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हिंदवी स्वराज्य ग्रुपचे अध्यक्ष कुणाल बोरकर, आशिष मस्के, आशिष लोंढे, हर्षद गोपाले, सचिव धनराज पुसतोडे, भारत बोरकर आणि गावातील नागरिकांनी विशेष मेहनत घेतली.

# बाबुराव पाटील महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती व लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील पुण्यतिथी साजरी

**मोहोळ । प्रतिनिधी**

बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा, इतिहास आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आणि लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत पारंपारिक पोषाख स्पर्धा, शिवचरित्रावरील व्याख्यान आणि सांस्कृतिक सादरीकरण आयोजित करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर, मुंबई येथील शास्त्रज्ञ




डॉ. बजरंग थिटे उपस्थित होते, तर प्रमुख वक्ते म्हणून इतिहास विभाग प्रमु व शिव व्याख्याते प्रा. डॉ. दादासाहेब पाटोळे यांनी मार्गदर्शन केले.
प्रा. डॉ. दादासाहेब पाटोळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा परामर्श घेत विविध उदाहरणांसह शिवचरित्र उलगडले, तर डॉ. बजरंग थिटे यांनी थोर व्यक्तींचे कार्य आपल्यासाठी प्रेरणादायी असून, ते अंगीकारणे आवश्यक आहे, असा संदेश दिला. प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी यांनी शिवाजी महाराज आणि लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील यांच्या समाजहितकारी कार्यावर प्रकाश टाकला.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. बापू मोहिते यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष थिटे यांनी करून दिला. भाग्यश्री गुंड हिने शिवगर्जना सादर केली, तर सानिका माने हिने प्रतापगडावरील पराक्रम हा पोवाडा सादर केला.पारंपारिक पोषाख स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. रविंद्र देशमुख व प्रा. नितीन गुंड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महादेव चव्हाण यांनी केले, तर आभार रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश शेटे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

# नव बौद्ध युवक संघटना तक्रारवाडी यांच्या वतीने एलईडी लाइटचे उद्धाटन

**पुणे । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त नव बौद्ध युवक संघटना तक्रारवाडीच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पूजनाने झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अभिवादन करत शिवरायांच्या पराक्रमाचा गौरव केला.या विशेष दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे एलईडी लाइटचे उद्धाटन करण्यात आले. गावाच्या विकासात हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.कार्यक्रमात नव बौद्ध युवक संघटनेचे श्री. सचिन आढाव यांनी शिवरायांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले, छत्रपती शिवाजी महाराज हे आमच्या संस्कृतीचा अभिमान आहेत. त्यांच्या विचारांवर चालत सामाजिक विकास घडविणे हे आमचे ध्येय आहे. शिवजयंती निमित्ताने महाराजांचे पराक्रम आणि आदर्श समाजव्यवस्थेची आठवण करून देत, त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याची गरज मान्यवरांनी व्यक्त केली.छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी संघर्ष केला. त्यांची युद्धनीती, प्रशासन कौशल्य आणि समुद्री आरमाराची स्थापना ही इतिहासातील महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे त्यांना भारतीय नौदलाचे जनक म्हणूनही ओळखले जाते.या कार्यक्रमास गावच्या उपसरपंच मनीषा प्रशांत वाघ, सीमा काळंगे, भिगवण पोलीस स्टेशनचे ए. पी. आय. विनोद महांगडे व कर्मचारी, पोलीस पाटील अमर धुमाळ, डॉ. बाळासाहेब भोसले यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.शिवजयंती निमित्ताने गावकऱ्यांनी एकजुटीने सामाजिक उपक्रम हाती घेण्याचा संकल्प केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार आजही प्रासंगिक असून, तो समाजाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक आहे, असा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.



# नरखेड येथे सिद्धेश्वर तालीम संघाच्या नूतन इमारतीचे उद्धाटन

## बाळराजे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुस्ती स्पर्धा

## विजय डोंगरे व किशोर भुई ठरले 'श्री सिद्धेश्वर केसरी'

**मोहोळ । प्रतिनिधी**

तालुक्यातील नरखेड येथे श्री सिद्धेश्वर तालीम संघाच्या वतीने आडमाळ हनुमान मंदिराजवळील तालीम इमारतीचे उद्धाटन माजी आमदार यशवंत माने यांच्या हस्ते आणि लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. तसेच कुस्ती स्पर्धेच्या मैदानाचे उद्धाटन हिंदकेसरी समाधान पाटील यांच्या हस्ते पार पडले.स्पर्धेतील पहिली मानाची कुस्ती विजय डोंगरे (मलिकपेठ) व अनिल जाधव (अकलूज) यांच्यात झाली. यामध्ये विजय डोंगरेने आडव्या हाताच्या पकड डावावर विजय मिळवत श्री सिद्धेश्वर



केसरीचा किताब पटकावला. दुसऱ्या लढतीत नरखेडच्या किशोर भुईने कुरुलच्या योगेश बंडगर याच्यावर ढाख डावाने विजय मिळवून किताबाचा मानकरी ठरला. विजेत्यांना चांदीची गदा आणि रोख पारितोषिक देण्यात आले.शंभर रुपयांपासून पाच हजार रुपयांपर्यंतचे बक्षीस असलेल्या शेकडो कुस्त्या मोठ्या उत्साहात पार पडल्या.हणमंत पोटरे, बालाजी साठे, गोविंद पाटील, महेश पवार, पंडित ढवण, आबासाहेब धावणे, राहुल कसबे, शाहजी मोटे, उत्तम मोटे, चंद्रकांत काळे, किशोर ताटे, प्रकाश राऊत, दत्तात्रय डोंगरे, दाजी रणपिसे, पांडुरंग गोडसे, शंकर राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.गणेश मोटे, समाधान राऊत, संतोष माळी, अण्णा मोटे, लोकत पवार, दत्ता वाघमोडे, राहुल पाटील, रणजीत उबाळे, अमर चव्हाण, छोटू राऊत आदींनी पंच म्हणून काम पाहिले.या कुस्ती स्पर्धेचे निवेदन संजय वाघमोडे आणि अशोक बनसोडे यांनी केले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना महिला आघाडीचा स्तुत्य उपक्रम



**कोल्हार । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना महिला आघाडीच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चंदनापुरी (ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात सुनीता शेळके व सुरेखा गव्हाणे यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना गणपती अथर्वशीर्ष, गणपती स्तोत्र आणि आई-वडिलांचे महत्त्व या विषयांवर अमुल्य असे मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी शिवसेना महिला आघाडी उत्तर नगर जिल्हाप्रमुख सुनीता शेळके यांनी पुढील वर्षभर लोककल्याणकारी उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमाला शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सुरेखा गव्हाणे, शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख अर्चना निबे, शाळेच्या प्राचार्या वंदना सातपुते यांच्यासह महिला आघाडीच्या पदाधिकारी, शिक्षकवृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत विजेअभावी आंदोलनाचा इशारा!



**वरोरा । प्रतिनिधी**

निवडणुकीपूर्वी आश्वासनांची खैरात, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांची फसवणूक! विजेच्या प्रतीक्षेत पाच-सहा वर्षे उलटूनही सरकारकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्र्यांविरोधात वरोरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

शेतकऱ्यांनी डिमांड भरली तरी महिनाभरात वीज जोडणी मिळायला हवी, मात्र अनेकांना वर्षानुवर्षे वीजच मिळत नाही, हा सरकारचा घोर हलगर्जीपणा असल्याचा आरोप केला आहे. सरकारने निवडणुकीपूर्वी मते मिळवण्यासाठी खोटी आश्वासने दिली, मात्र प्रत्यक्षात काहीच केले नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

यासंदर्भात शेतकरी नेते किशोर डुकरे यांच्या नेतृत्वात तहसीलदार योगेश कौटकर यांच्यामार्फत प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. तत्काळ कारवाई न झाल्यास दि. १० मार्च २०२५ रोजी नागपूर-चंद्रपूर महामार्गावर रास्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा थेट इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

या लढ्यात शेतकऱ्यांसोबत अक्षय बोंदुलवार, विशाल देठे, श्रीकृष्ण देवतळे, माधव जीवतोडे, गोविंदा पाकमोडे, अंकित देठे, आकाश धवणे, सुनील चिडे, बालू आवारी, नितीन मोरे, प्रेमानंद सूर आदी लढवय्ये उपस्थित होते.

# आजपासून भद्रावतीत पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा

## नवोदय स्पोर्टिंग क्लबचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

येथील नवोदय स्पोर्टिंग क्लबच्या वतीने दिनांक २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान भव्य खुली पुरुष हॉलीबॉल स्पर्धा स्थानिक किल्ला वार्ड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पटांगणावर आयोजित करण्यात आली आहे. दिनांक २१ फेब्रुवारीला सायंकाळी सहा वाजता स्पर्धेचे उद्धाटन भद्रावती वरोरा क्षेत्राचे आमदार करण देवतळे यांच्या शुभहस्ते तर शिवसेना नेते मुकेश जीवतोडे यांच्या अध्यक्षतेत होणार आहे . यावेळी माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, उपाध्यक्ष प्रफुल चटकी,चंद्रपूर जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष प्रमोद आवटे, सचिव सुनील आखाडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. सदर स्पर्धेत नागपूर, अमरावती, पुणे, कोल्हापूर, संभाजीनगर, चंद्रपूर, मुंबई, यवतमाळ येथील संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ४१,००० रुपये द्वितीय ३१,०००, तृतीय २१,००० रुपये रोख व चषकासह मॅन ऑफ द टूर्नामेंट, बेस्ट समॅशर, बेस्ट लिफ्टर, ब्लॉकर, बेस्ट डिफेन्सर, बेस्ट सर्विस आदि आकर्षक गिफ्ट देण्यात येणार असून दिनांक २३ फेब्रुवारी सायंकाळी ९ वाजता या स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा होणार असून या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिवसेना नेते मुकेश जिवतोडे, पोलिस निरीक्षक अमोल काचोरे, माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, उपाध्यक्ष प्रफुल चटकी , संतोष आमने, सुधीर सातपुते, चंद्रकांत खारकर, राजू सारंगधर, विनोद वानखेडे, अमित गुंडावार , सातपुते आदी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता अध्यक्ष प्रवीण मत्ते, उपाध्यक्ष दिनेश उलमाले, सचिव प्रफुल चटकी, प्रणय पतरंगे, गोपिक भोयर, अभिषेक काकडे ,नितीन जगताप, विनोद काळे, आशिष काळे, शुभम बोरकुटे आदींसह नवोदय स्पोर्टिंग क्लबचे पदाधिकारी सदस्य परिश्रम घेत आहे.

# मुक्ता नरेंद्र दाभोलकर आज भद्रावतीत



**भद्रावती । प्रतिनिधी**

सामाजिक चळवळीतील अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रमुख मार्गदर्शक व प्रणेते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची कन्या मुक्ता दाभोलकर (सामाजिक कार्यकर्ता) विदर्भाच्या दौऱ्यावर असून, २१ फेब्रुवारीला भद्रावती ऐतिहासिक नगरीत येत आहेत. त्या येथील सामाजिक कार्यकर्ते रवींद्र तिराणिक यांच्या निवासी जनसंपर्क कार्यालयात सकाळी १० वाजता भेट देतील. नंतर ११ वाजता राजमनी गार्डन व सभागृह रेल्वे स्टेशन रोड गवराळा येथे उपस्थित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन संघटनेच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी सामाजिक चळवळीतील विशेष विषय संदर्भात संवाद साधतील. दुपारी २.३० वाजता चंद्रपूर येथील शासकीय विश्रामगृहात कार्यकर्त्यांच्या बैठकीस उपस्थित राहतील. पत्रकारांसोबत संवाद साधतील. ५ वाजता मूल येथे कार्यकर्त्यांच्या बैठकीत उपस्थिती दर्शवतील. अशी माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने रविंद्र तिराणिक यांनी दिली आहे.

## ब्रम्हपुरी येथे शिवजन्मोत्सव सोहळा व प्रबोधनात्मक कार्यक्रम

# जुलमी सत्ते विरोधात रयतेसाठी लढणारे छत्रपती शिवराय आदर्श राजे -विधीमंडळ पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वीर पराक्रमी शिवबांची कीर्ती ही संपुर्ण जगव्यापी असून ती युवा पिढीला प्रेरणादायी आहे . त्यांनी औरंगजेब सारख्या बलाढ्य जुलमी हुकुमशहा विरोधात मूठभर मावळे घेऊन बंड पुकारून रयतेसाठी लढा उभारला. आपल्या प्रजेप्रती प्रचंड निष्ठा व आपुलकी बाळगणारे छत्रपती शिवराय हे थोर आदर्श राजे होते. असे प्रतिपादन विधिमंडळ पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले ते ब्रह्मपुरी येथे शिवछत्रपती फाउंडेशन द्वारा शिवजयंती निमित्ताने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा तथा प्रबोधनात्मक कार्यक्रमाप्रसंगी उद्धाटक म्हणून बोलत होते.

आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा व प्रबोधनात्मक कार्यक्रमास चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव कीरसान, प्रा. डॉ. देवेश कांबळे, डॉ. राजकुमार शेंडे ,खेमराज तिवाडे ,प्रा. संजय मगर, प्रा. डॉ. राकेश तलमले , इंजि. लिलाधर बांगरे ,प्रशांत पिलारे ,हेमंत नाकतोडे ,आकाश खंडाळकर ,विलास दुपारे , माजी नगरसेवक डॉ. नितीन उराडे प्रामुख्याने मंचवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी सर्व धर्म जातीच्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्याची मूठ बांधली. तर सर्व समाजाचे कल्याण करणे हेतूने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व समावेशक अनमोल असे देशाला संविधान दिले. या दोन महापुरुषांचा इतिहास कधीही कुणीही मिटवू शकणार नाही हे तेवढेच सत्य आहे. अलीकडे देशात विपरीत परिस्थिती निर्माण झाली असून धर्मांधतेतून जाती जातींमध्ये भांडणे लावून अराजकता माजविली जात



आहे. देशाची एकात्मता,सार्वभौमत्व व लोकशाही टिकविण्यासाठी युवकांनी छत्रपती शिवराय व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अतुलनीय कार्यातून प्रेरणा घ्यावी. असे आव्हानही त्यांनी यावेळी उपस्थिताना केले. यानंतर अध्यक्षीय भाषणात डॉ. देवेश कांबळे म्हणाले की, छत्रपती शिवरायांच्या शौर्याचा इतिहास पाठीशी ठेवून व्हिएतनाम सारख्या अगदी लहानशा देशाने अमेरिका सारख्या बलाढ्य देशाला पराभूत केले. ही छत्रपती शिवबांची महती असून आज देशाला छत्रपती शिवराय व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची गरज आहे. तरुणांनी या विचारांना आदर्श मानून देश घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा असे त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शनपर बोलताना सांगितले.यानंतर प्रसिद्ध प्रबोधनकार राहुल अन्वीकर यांचा शिवराय ते भीमराव या प्रभोधनात्मक गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. आपल्या प्रास्ताविकातून शिवछत्रपती फाउंडेशन चे अध्यक्ष मोंटू (जगदीश) पिल्लारे यांनी छत्रपती शिवरायांचा पुतळा निर्मिती बाबत आलेल्या अडचणी व त्यावर क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी केलेले सहकार्य सोबतच शिवजयंतीची परंपरा याबद्दल विस्तृत माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेश तलमले, यांनी केले. आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा व प्रबोधनात्मक कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती दर्शविली.

## चंद्रपुर,बल्लारपूर,दुर्गापूर येथे शिवजयंती उत्सव साजरा

# छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र देशाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक

## आ.श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन

### आ. मुनगंटीवार यांचा अखखा दिवस 'शिवमय'

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त चंद्रपूर येथील जनसंपर्क कार्यालयात शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आ. श्री. मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले. भाजपा महानगर चंद्रपूरतर्फे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रमातही ते उपस्थित होते. सन्मित्र सैनिकी विद्यालय चंद्रपूर येथे आयोजित कार्यक्रमातही आ. मुनगंटीवार उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी परेडच्या माध्यमातून शिवरायांना मानवंदना दिली. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दुर्गापूर (जि. चंद्रपूर) येथे महाराजांच्या शिल्पाचे अनावरण आ. श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. छत्रपतींचे हे शिल्प सर्वांना सूर्याप्रमाणे ऊर्जा आणि प्रेरणा देत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### श्रीशैलम ते आग्रा

श्रीशैलम येथे महाराजांनी तपश्चर्या केली होती. तेथे सव्वातीन कोटी रुपये खर्च करून महाराजांचे ध्यान मंदिर उभारले. हेही सौभाग्य मिळाल्याचा आनंद श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा जिथे औरंगजेबाने अपमान केला, त्या आग्र्यातही शिवजयंती साजरी होत असल्याचा मला अभिमान आहे, असेही ते म्हणाले.

### संकल्प करण्याचा दिवस

शिवजयंतीनिमित्त फडकवलेला भगवा म्हणजे फक्त कपड्याचा एक तुकडा नाही. तर ते आमचे अस्तित्व आहे. भगवा म्हणजे भयरहित, गर्वरहीत, वासनारहित समाज हे भगव्याचे वैशिष्ट्य आहे. आजचा दिवस म्हणजे महाराजांचे विचार 'झोपडी से खोपडी तक' पोहोचवण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे, असे ते म्हणाले.

### दरवर्षी राज्याभिषेक दिन

सांस्कृतिक कार्यमंत्री म्हणून आपण घेतलेल्या निर्णयामुळे दरवर्षी राज्यभिषेक दिन साजरा होणार आहे. महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांत जाणता राजा कार्यक्रम राबवले यांचे समाधान आहे. १२ गडकिल्ल्यांना जागतिक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी युनेस्कोला प्रस्ताव पाठवला असल्याचे आमदार मुनगंटीवार यांनी सांगितले. मानवतेची, अस्मितेच्या अभिमानाची, मातीच्या कणाकणांत ऊर्जा निर्माण करण्याची, गवताचंही पातं उचललं तर ते पातं दुष्टांना नष्ट करणारी तलवार बनवण्याची, ही शपथ प्रत्येक शिवभक्ताने घ्यावी, असेही आवाहन आ.श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

### महाराजांच्या गडकिल्ल्यांची नोंद

महाराष्ट्र राज्याचा सांस्कृतिक कार्यमंत्री या नात्याने जगाने शिवाजी महाराजांची प्रेरणा घ्यावी यासाठी यूनेस्कोकडे १२ गडकिल्ले पाठविले आहेत. या मानांकनाला निश्चितच जागतिक वारसा स्थळे म्हणून स्थान मिळेल आणि जगातील अनेक पर्यटक आपल्या राज्यात येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आपण आणि स्वत:चा परिवार एवढाच विचार करण्यापेक्षा समाजाप्रति विचार करण्याचे शिवतत्व अंगीकारण्याचे आवाहनही त्यांनी केले. समाजाला चांगले करण्याची इच्छा अंतर्मनात निर्माण केली तर २०४७ हा विकसीत भारताचा प्रगतशील शताब्दी महोत्सव असेल, असा विश्वास व्यक्त करीत त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे कुशल प्रशासन, त्यांची नियोजनाची शैली, युद्धकलेतील निपुणता आजही प्रत्येक पावलावर मार्गदर्शक ठरत आहेत. शिवाजी महाराजांचे संपूर्ण चरित्र हेच देशाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक आहेत, या शब्दांत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले.

चंद्रपुर, बल्लारपूर, दुर्गापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा करण्यात आला. चंद्रपूर येथील गिरनार चौक येथे भाजपा महानगरच्या वतीने, पोलीस कल्याण सभागृहात मराठा महासंघातर्फे, बाबुपेठ येथे शिवसंकल्प सामजिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे उत्सव आयोजित करण्यात आला. तर बल्लारपूर येथील रविंद्र नगर वॉर्ड येथील उत्सवात, चंद्रपूर येथील माता कन्नमवार चौकातील उत्सवात, दुर्गापूर पोलीस स्टेशनजवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांना आ. श्री. मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच एमडीआर मॉल येथे रवीश सिंग यांच्यातर्फे आयोजित 'छावा' चित्रपटाच्या शोसाठी आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती होती.७५० वर्षांपेक्षा जास्त गुलामगीरीचा इतिहास आपण बघितलाय. सर्वत्र अंधःकार होता. अशात १९ फेब्रुवारी १६३० ला शिवनेरीवर शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यांच्यात सूर्यापेक्षाही जास्त पराक्रमाचे तेज होते. महाराजांनी ७५० वर्षांच्या गुलामगिरीची चिन्हं मिटवत भारतमातेच्या सुपुत्रात किती शक्ती असू शकते हे दाखवून दिले. युक्ती, भक्ती आणि शक्ती याचा त्रिवेणी संगम छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये होता. जेव्हा गोठ्यातील गाय आणि घरातील माय मोघलांच्या आक्रमणात धोक्यात आली, तेव्हा हजारो सूर्यांचे तेज असणाऱ्या शिवबाचा जन्म तंजावर ते पेशावर छत्रपती शिवाजी महाराजांनी भवानी तलवारीचे तेज दाखवून दिले. संघटन कौशल्य, नितीमत्ता, संकल्प या सर्वांवर त्यांचे प्रभूत्व होते, या शब्दांत आ. श्री. मुनगंटीवार यांनी महाराजांची महती विषद केली.निर्धार आणि संकल्प हे महाराजांचे सर्वांत मोठे गुण होते. कितीही संकटे आली तरी छत्रपती कधीही डगमगले नाहीत, असंही ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नियोजन कौशल्याबद्दल ते म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांचे नियोजन आयआयएममध्ये शिकवले गेले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या नियोजनाच्या माध्यमातून जहाज, बोट, तोफखाने उभे केले. अफजलखानाचा सामना करताना त्यांनी नियोजनाचाच प्रभावी वापर केला.' छत्रपती शिवाजी महाराजांचे नियोजन व्हिएतनाम सारखा देश शिकवतो, हे देखील त्यांनी प्रकर्षाने नमूद केले. तसेच जेएनयूमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नियोजनाच्या अभ्यासासाठी निधी उपलब्ध करुन दिल्याचा त्यांनी उल्लेख केला.राज्याचा सांस्कृतिक कार्यमंत्री म्हणून ३५०वा राज्याभिषेक सोहळा आयोजित करण्याचे भाग्य लाभल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, 'अफजलखानाचा कोथळा महाराजांनी कसा बाहेर काढला, हे शाळेतल्या शिक्षकांनी सांगितले होते. त्या कथा ऐकत-ऐकत मोठा झालो. अफजलखानाच्या कबरीवरील अतिक्रमण काढण्यासाठी २९ जुलै १९५३ पासून मागण्या, आंदोलन केले गेले. पण एकाही सरकारने ते काढले नाही. ते अतिक्रमण हटवण्याचं सौभाग्य चंद्रपूरचा सुपूत्र म्हणून मला लाभल्याचा आनंद आहे. अफजलखान लाखो सैनिकांसह आला, आतंक पसरवत आला. पण महाराजांनी वाघनखांनी त्याचा कोथळा बाहेर काढला. ती वाघनखे लंडनच्या संग्रहालयातून भारतात आणण्याचे भाग्य मला लाभले. पहिल्यांदा वाखनखांचं दर्शन घेतलं तेव्हा प्रचंड ऊर्जा मिळाली, अशी भावना श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केली. भारत-पाकिस्तानच्या सीमेवर जेथे सर्जीकल स्ट्राईक झाला होता, तेथून ७ किलोमीटर अंतरावर सीमेवर १२ फुटांची महाराजांची प्रतिकृती उभी केली. पाकिस्तानच्या दिशेने तलवार धरून असलेला महाराजांचा पुतळा बघून अभिमानाने मान उंचावते.'

## सौरऊर्जेच्या तज्ज्ञ घडविण्यासाठी अहिल्यानगरमध्ये विशेष प्रशिक्षण सुरू

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

वाढत्या ऊर्जा मागण्या आणि पर्यावरणपूरक वीज निर्मितीच्या गरजेनुसार सौरऊर्जेच्या तज्ज्ञांची मागणी वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, विळदघाट एमआयडीसी, अहिल्यानगर येथे 'सोलर पॅनल इंस्टॉलेशन टेक्निशियन' या कोर्सची पहिली बॅच सुरू झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुरस्कृत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जात आहे.



गुरुवारी (२० फेब्रुवारी) या बॅचचा शुभारंभ झाला असून, ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. या ५४० तासांच्या प्रशिक्षणक्रमात विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि रोजगारक्षमतेसाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, या कोर्समध्ये प्रकल्प कार्य, सौरऊर्जेचे तांत्रिक ज्ञान, सुरक्षितता उपाय, तसेच व्यावसायिकतेसंबंधी विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना सौरऊर्जेच्या विविध घटकांवर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले जाणार आहे. यात अग्निशमन यंत्राचा वापर, कृत्रिम श्वास, आपत्कालीन परिस्थिती हाताळणे, सौर नकाशा तयार करणे, किरणोस्तराची तीव्रता मोजणे, साइट तपासणी आणि पॅनेल इंस्टॉलेशन यांसारख्या महत्त्वाच्या कौशल्यांचा समावेश आहे.

केंद्र सरकारच्या कौशल्य विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील, तसेच उद्योजकतेला चालना मिळेल. सौरऊर्जा हे भविष्यातील स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेचे मोठे साधन असल्याने या क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज वाढत आहे. त्यामुळे या कोर्सला चांगला प्रतिसाद मिळत असून, इच्छुक विद्यार्थ्यांसाठी पुढील बॅचेस लवकरच जाहीर होणार असल्याचे संस्थेचे प्राचार्य ए. व्ही. सूर्यवंशी यांनी सांगितले.

## महिला सवलतीमुळे एसटी तोट्यात; भविष्यात कोणतीही नवीन सवलत नाही-मंत्री सरनाईक

**मुंबई । विराम पवार**

एसटी प्रवासात महिलांना ५०% सवलत देण्याच्या योजनेमुळे महामंडळाला दररोज ३ कोटी रुपयांचा तोटा होत असल्याची कबुली परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. त्यामुळे यापुढे एसटीमध्ये कोणतीही नवीन सवलत दिली जाणार नाही, असे स्पष्ट वक्तव्य त्यांनी धाराशिव येथे केले.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, एसटी महामंडळाच्या ताफ्यातील सुमारे ६०% बसेस भंगार अवस्थेत आहेत. भाडेवाढ केल्याने काही प्रमाणात तोटा भरून निघत असला, तरी एसटीची स्थिती सुरळीत होण्यासाठी किमान दोन ते तीन वर्षे



लागतील.

मागील सरकारने महिलांसाठी ५०% सवलत योजना लागू केल्यानंतर महिलांनी मोठ्या प्रमाणावर एसटीचा वापर केला. मात्र, विरोधकांनी वारंवार या योजनेमुळे एसटी तोट्यात गेल्याचा आरोप केला होता, जो सत्ताधारी पक्षाने नाकारला होता. मात्र, आता खुद्द परिवहन मंत्र्यांनीच या तोट्याची कबुली दिल्याने महायुती सरकारवर टीका होण्याची शक्यता आहे.

'व्हाईस ऑफ मीडिया' पत्रकार संघटनेच्या कार्यक्रमात पत्रकारांसाठी एसटी प्रवासात सवलत देण्याची मागणी करण्यात आली. त्यावर बोलताना सरनाईक यांनी, 'सवलतीमुळेच एसटी तोट्यात गेली आहे, त्यामुळे भविष्यात कोणतीही नवीन सवलत दिली जाणार नाही,' असे स्पष्ट केले. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या सवलती बंद केल्या जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, नवीन सवलती देण्यास सरकारने स्पष्ट नकार दिला आहे.

## प्रशासकीय महाविद्यालयाचा शैक्षणिक अभ्यास दौरा यशस्वी




**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक डॉ. विवेक शिंदे प्रशासकीय महाविद्यालय येथील शैक्षणिक सहलीमध्ये विद्यार्थ्याचा उत्फुर्त सहभाग लाभला. दरवर्षी शैक्षणिक सहल अभ्यास दौऱ्याचे आयोजन महाविद्यालयातर्फे केले जाते. याद्वारे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक तसेच पर्यटन विषयक अभ्यास व्हावा हा हेतू लक्षात घेऊन सहभागी विद्यार्थांनी बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय, गणपती टेंपल अदासा, कोराडी मंदीर तसेच विविध ठिकाणी भेट दिली. यावेळी महाविद्यालयातील प्रा. प्रज्ञा बुरडकर, प्रा. प्रिती कांदीकट्टीवार, प्रा. नेहा मानकर, प्रा. विशाल प्रसाद तसेच प्रा. कपिल राऊत यांच्या देखरेखीत शैक्षणिक अभ्यास दौरा पार पडला असुन या अभ्यास दौरा करिता संस्थेचे सचिव डॉ. कार्तिक शिंदे, संस्थेचे विश्वस्त डॉ. जयंत वानखेडे, डॉ. प्रशांत पाठक, तसेच प्राचार्य प्रमोद पाठक यांचे मार्गदर्शन लाभले.

## शिवजयंती निमित्याने गृहउद्योग प्रारंभ व स्वछता दूत सत्कार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज ह्यांचे जयंती निमित्याने स्थानिक विकलांग सेवा समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज ह्यांचे प्रतिमापूजन करण्यात आले. तसेच तुळशीनगर परिसरात स्वच्छ परिसरासाठी बहुमोल योगदान देणाऱ्या युवा सुरेश येरगुडे ह्यांचा शॉल श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन संस्था सचिव देवराव कोंडेकर ह्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आध्यात्मिक बाल संस्कार केंद्र मार्गदर्शिका नंदा बिहाडे, सुरेश खाडे सुनंदा पान्हेरकर उपस्थित होते. तसेच स्वयंसिद्धा महिला बचत गट समूहाद्वारा पूजा पान्हेरकर व इतरांद्वारा 'शेवया निर्मिती 'गृहउद्योग शुभारंभ करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती प्रित्यर्थ शिवभोजन लाभार्थी व इतरांना मुंबईकर महानिर्मिती कम्पनी गुणवन्त कामगार





नितीन मुरली राव द्वारा मिठाई वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजश्री शिंदे, सोनू दुपारे इत्यादीनी मौलिक सहकार्य दिले.

## भीमा-सिना जोड कालव्याच्या पाण्यासाठी दिग्विजय बागल यांची तातडीची मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**

भीमा-सिना जोड कालवा बोगद्यावरील लाभक्षेत्रातील गावांना शेतीच्या सिंचनासाठी तातडीने पाण्याचे आवर्तन सुरू करावे, अशी मागणी मकाईचे माजी चेअरमन आणि शिवसेना जिल्हा युवा नेते दिग्विजय बागल यांनी केली आहे. या संदर्भात माहिती देताना बागल म्हणाले की, ३ जानेवारीपासून ३०० क्युसेक्स वेगाने सुरू असलेले पाण्याचे आवर्तन १५ फेब्रुवारी रोजी अचानक थांबवले गेले. यामुळे करमाळा विधानसभा कार्यक्षेत्र आणि माढा तालुक्यातील उपळवटे, ढवळस, भोगेवाडी, जाखले, रोपळे, कव्हे, बारलोणी, चोबे पिंपरी, महादेववाडी आणि दहिवली या बोगद्यावरील लाभक्षेत्रातील गावांमध्ये शेतीच्या सिंचनाची गंभीर समस्या



निर्माण झाली आहे. गहू, हरभरा, ऊस, ज्वारी, केळी आणि मका या पिकांवर याचा फटका बसत असून, पाणीअभावी पिके करपू लागली आहेत. यंदा उजनी धरणात समाधानकारक पाणीसाठा असूनही लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उन्हाळ्याच्या प्रारंभापासूनच तापमान वाढले असल्याने सिंचनासाठी पाणी आवश्यक आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने तातडीने बोगद्याद्वारे पाणी सोडावे, अशी मागणी दिग्विजय बागल यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्याचेही त्यांनी सांगितले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .